# फायनान्स अँण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१

(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)

| विशाल लोहार | विजय जाधव | प्रितम घोगरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | महासचिव | उपाध्यक्ष |
| ९६६५२०२७३६ | ९३०९८१७९८३ | ९३७०९३१५९२ |

संदीप तिकटे
कोषाध्यक्ष
९७६६२०९६७८

प्रशांत नरड
प्रसिद्धी प्रमुख
९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार
सहसचिव
९६६५३०५५७७

विलास लकडे
सहसचिव
९६३७४१५४४५

भूषण शिंदे
संघटक
९११९५९५७६५

स्नेहल वैष्णव
महिला प्रतिनिधी
९६३७४१५४४५


जा.क्र.FAEU/मुख्य कार्या.मुंबई/009 दिनांक:15/09/2025

**प्रति,**
**मा. व्यवस्थापकीय संचालक,**
**महावितरण कंपनी मर्या., प्रकाशगड,**
**बांद्रा (पूर्व), मुंबई – ५१.**

**विषय :** महावितरण वीज कंपनी मधील सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी समाधानकारक सानुग्रह अनुदान मिळणेबाबत.

महोदय,

राज्याच्या आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक प्रगतीत महावितरण कंपनीचे मोठे योगदान आहे. मानवी जीवनातील मुलभूत गरजाप्रमाणेच वीज ही अत्यावश्यक गरज आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असणारी महावितरण ही राज्यातील शेती, उद्योग आणि वाणिज्य क्षेत्राला वीज पुरवठा करणारी प्रमुख कंपनी आहे.ग्राहकसंख्येच्या दृष्टीने आणि वीज पुरवठ्याच्या प्रमाणात महावितरण ही भारतातील एक प्रमुख कंपनी आहे.

कंपनीच्या विकासामध्ये कमर्चारी हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. कंपनीचा मूळ उद्देश तत्पर ग्राहकसेवा पुरवणे तसेच वीज क्षेत्रातील घातक स्पर्धेमध्ये प्रामाणिक संरक्षकाची भूमिका बजावणारे तसेच महावितरणचे अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी वेळोवेळी अद्यावत होणाऱ्या प्रणालीचा सुयोग्य वापर करून ग्रामीण तसेच शहरीभागात दर्जेदार सेवा देणारे अतांत्रिक/तांत्रिक कर्मचारी हे कंपनीच्या प्रगतीचा पायाच आहेत.ज्याप्रमाणे हृदय शरीरात रक्त पंप करून प्रत्येक अवयवाला ऊर्जा देते, त्याचप्रमाणे लेखा कर्मचारी-अधिकारी कंपनीचे आर्थिक व्यवस्थापन सांभाळून कंपनीला आर्थिक स्थिरता मिळावी यासाठी अविरत प्रयत्न करीत असतात. ते कंपनीच्या उत्पन्नाचे आणि खर्चाचे रेकॉर्ड ठेवून अचूक अंकेक्षण करतात. यामुळे कंपनीला आर्थिक शिस्त लागते आणि भविष्यासाठी योग्य नियोजन करणे सोपे जाते. कंपनीच्या आर्थिक व्यवहारात स्थिरता ,पारदर्शकता व ग्राहकांची विश्वासार्हता टिकून राहते.

**केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने अलिकडेच जाहीर केलेल्या पॉवर डिस्कॉम रेटिंगबद्दल मा.मुख्यमंत्र्यांनी गौरविले व त्यांनी जाहीर केले की महाराष्ट्राने अव्वल दर्जाचा 'अ' रेटिंग मिळवला आहे आणि पश्चिम विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. महावितरणच्या या कार्याला १०० पैकी ९३ गुणांसह, त्यांनी ही एक महत्त्वपूर्ण उडी म्हणून अधोरेखित केली आहे.हे सर्व कंपनीचे उत्तम व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांचे प्रामाणिक काम यामुळे शक्य झाले आहे**

दिवाळी हा भारतातील सर्वात मोठा सण असून सर्वत्र साजरा होणारा महत्त्वाचा सण आहे. त्याच दृष्टीकोनातून कर्मचाऱ्याचे मनोबल उंचावून त्यांची कार्यक्षमता वृद्धिंगत करणेसाठी कंपनी दरवर्षी दिवाळी पूर्व सानुग्रह अनुदान सन साजरा करणेसाठी जाहीर करते. मात्र सदर सानुग्रह अनुदान जाहीर करतांना सहाय्यक कमर्चारी यांना नियमित कर्मचारी यांच्या तुलनेत कमी रक्कम जाहीर करून असमान वागणूक दिली जाते. प्रत्यक्षात सण हा सर्वांसाठी समान असतो मग सहाय्यक असो कि नियमित कर्मचारी. त्यामुळे कनिष्ठ सहाय्यक लेखा व इतर सर्व सहाय्यक कमर्चारी यांना नियमित कर्मचारी यांचे प्रमाणेच सानुग्रह अनुदान जाहीर करावे. **चालू वर्षात समानतेची दिवाळी ह्या संकल्पनेची सुरवात करावी.**

महावितरण कंपनीतील सर्व श्रेणी व गटातील वीज कर्मचारी,अधिकारी यांनी केलेल्या लौकिक कार्याची दखल घेवून दरवर्षी प्रमाणे येणाऱ्या दिवाळी सनापूर्वी रूपये ३० हजार सानुग्रह अनुदान नियमित व सहाय्यक भेदभाव न करता सरसगट अदा करून प्रोत्साहित करावे, ही विनंती.

अध्यक्ष
**विशाल लोहार**

प्रत सादर :- मा.मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी,महावितरण.मुख्य कार्यालय,प्रकाशगड,मुंबई.